# खाजगी सुरक्षा यंत्रणा परवाना मंजुरी व नुतनीकरणाबाबतच्या सुचना

पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयाकडुन यापुर्वी खाजगी सुरक्षा यंत्रणाना परवाना देण्यात येत होते. परंतु, गृह विभाग महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्र. पीएसए-१२१८/प्र.क्र.३६८/विशा ४, दि. २९/०१/२०२० अन्वये खाजगी सुरक्षा यंत्रणांना देण्यात येणा-या परवाना प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्यासाठी केंद्र शासनाने सदर परवाना ऑनलाईन पध्दतीने देण्यासाठी PSARA Online Application Software ची निर्मिती केली आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्यासाठी दि. २८/११/२०१९ रोजी PSARA Online Application Software ही प्रणाली खाजगी सुरक्षा यंत्रणांना परवाना देण्यासाठी उपलब्ध केली आहे असे कळविले आहे. त्यामुळे या कार्यालयाकडुन खाजगी सुरक्षा यंत्रणांना परवाना देण्याचे/ नुतनीकरण करण्याचे कामकाज बंद करण्यात आलेले आहे. दि. २९/०१/२०२० पर्यत नवीन परवान्यासाठी व नुतनीकरण करण्यासाठी या कार्यालयात प्राप्त अर्जावर शासनाच्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सदर तारेखेनंतर इकडील कार्यालयात कोणतेही अर्ज स्विकारले जात नाहीत.

तरी ज्यांना नवीन खाजगी सुरक्षा यंत्रणा परवाना करीता अर्ज करावयाचे असल्यास त्यांनी व ज्यांना पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयाकडुन यापुर्वी मंजुर खाजगी सुरक्षा यंत्रणा परवान्याचे नुतनीकरण करावयाचे असल्यास त्यांनी www.psara.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने शासनाकडे अर्ज सादर करावेत. पुढील सर्व कार्यवाही शासनाकडुन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

.........................................................